३९

जा.क्र.उमाशि-४/पुवि/अनु./मान्यता/०५-०६
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

प्रति

26 SEP 2005

प्राचार्य/मुख्याध्यापक,

न्यु इंग्लिश स्कूल,
कडूस, ता. राजगुरुनगर,
जि. पुणे.

**विषय :** उच्च माध्यमिकचे कनिष्ठ महाविद्यालयीन प्रथम/ द्वितीय वर्षाचे नविन / जादा /अतिरिक्त शाखा वर्ग टक्केवारीनुसार अनुदान तत्वावर सन २००५-०६ साठी पुढील टप्पा मंजूरीबाबत. .

**संदर्भ :**
१. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एचएससी/१७०३/ (२१४/०३) उमाशि-१, दि. २२.१.२००४
२. मा. शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक
अ) एचएससी/१३२०००/०३-०४/अनुदान/१२ एचएस, दि. ३०.१.२००४

आपल्या संस्थेच्या मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विनाअनुदान तत्वावर मंजूर केलेल्या प्रथम/द्वितीय वर्षाच्या तुकडीला शासनाने तसेच संचालनालयाने संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या अधिकारानुसार चालू आर्थिक वर्ष २००५-०६ करिता प्रचलित नियमाप्रमाणे पुढील अनुदान टक्केवारीचा टप्पा खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| इयत्ता | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | एकूण | २००४-०५ मधील देण्यात आलेला अनुदानाचा टप्पा | २००५-०६ मध्ये मंजूर करण्यात आलेला अनुदानाचा टप्पा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ वी | प्रथम | — | — | — | एक | ८० % | १०० %. |
| १२ वी | — | — | — | — | — | — | — |

सदरच्या तुकड्यांना विद्यार्थ्यांची हजेरी, शैक्षणिक अर्हता, प्राप्त शिक्षक वर्ग, शैक्षणिक सुविधा इमारत इ. बाबीच्या अटीवर अनुदान तत्वावर आणण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे तुकड्या अनुदानावर आलेल्या आहे. सन २००५-०६ मध्ये या कार्यालयाने मंजूर वर्ग तुकड्या व त्यामधील प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या व पटपडताळणीनुसार शिक्षक कपात लागू केलेल्या वर्ग व तुकड्यांचे अनुदानातून सदर रकमेची वजावट करण्यात येईल.

सोबत दिलेल्या परिपत्रकानुसार अनुदानावर आलेल्या तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षकांची मान्यता वेळेत घेण्यात यावी व देयके वेतनपथकाकडे सादर करावे.

(मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.)

प्राचार्य
शिक्षण उपसंचालक उच्च माध्यमिक विद्याल
पुणे विभाग, कडूस ता. खेड, जि. पुणे

अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ
कडूस, ता. खेड, जि. पुणे.

प्रतिलिपी : मा. शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्यमिक),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१. यांना माहितीसाठी सादर.

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/नगर.
यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित. तसेच सुचित करण्यात येते की, वरील वर्ग अनुदान टप्प्यावर अनुदान तत्वावर आणण्याची कार्यवाही करण्यात आली असल्यामुळे सदर तुकडीवर नियुक्त कर्मचाऱ्याचे वेतन उपलब्ध निधीतून अदा करण्यात यावे व निधी कमतरता असल्यास आवश्यक त्या तरतुदीची मागणी सुधारीत अंदाजपत्रकात न चुकता करण्यात यावी.

३. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/नगर.
यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त अनुदान टप्प्यावर आणलेल्या तुकडीवर नियुक्त कर्मचाऱ्यांची वेतन देयके उपलब्ध निधीतून अदा करावीत. जादा निधीची आवश्यकता असल्यास सुधारीत अंदाजपत्रकात मागणी न चुकता करण्यात यावी.

(35)

(2)

जाक्र.उमाशि-१/पुवि/अनु./मान्यता/०६-०७
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : ९।८।६

प्रति

प्राचार्य/मुख्याध्यापक,
न्यु इंग्लिश स्कूल व क. म. वि.
कडूस . ता. खेड.
जि. पुणे.

विषय : उच्च माध्यमिकचे कनिष्ठ महाविद्यालयीन प्रथम/ द्वितीय वर्षाचे नविन / जादा /अतिरिक्त शाखा वर्ग अनुदान तत्वावर सन २००६-०७ पासून आदिवासी उपयोजना क्षेत्र अंतर्गत मंजूरी. . .

संदर्भ : १. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. नमाशा/१०९९/(१०७६/९९)/ माशि-१, दि. ११.१०.२०००.
२. शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. एचएससी/१७०३/(२१४/०३) उमाशि-१, दि. २२.१.२००४
३. मा.शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक
अ) एचएससी/१३२०००/०३-०४/अनुदान/१२ एचएस, दि. ३०.१.०४

आपल्या संस्थेच्या मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विनाअनुदान तत्वावर मंजूर केलेल्या प्रथम/द्वितीय वर्षाच्या तुकडीला शासनाने तसेच संचालनालयाने संदर्भिय पत्रान्वये दिलेल्या अधिकारानुसार चालू आर्थिक वर्ष २००६-०७ करिता नियमाप्रमाणे पुढील ~~आदिवासी उपयोजना~~ अंतर्गत खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| इयत्ता | कला | विज्ञान | वाणिज्य | संयुक्त | एकूण | २००५-०६ मधील देण्यात आलेला अनुदानाचा टप्पा | २००६-०७ मध्ये मंजूर करण्यात आलेला अनुदानाचा टप्पा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ वी | — | — | — | — | — | — | — |
| १२ वी | प्रथम | — | — | — | एक | ८० % | १०० % |

सदरच्या तुकड्यांना विद्यार्थ्यांची हजेरी, शैक्षणिक अर्हता, प्राप्त शिक्षक वर्ग, शैक्षणिक सुविधा इमारत इ. बाबीच्या अटींवर अनुदान तत्वावर आणण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे तुकड्या अनुदानावर आलेल्या आहे. सन २००६-०७ मध्ये या कार्यालयाने मंजूर वर्ग तुकड्या व त्यामधील प्रत्यक्ष विद्यार्थी संख्या व पटपडताळणीनुसार शिक्षार्थ कपात लागू केलेल्या वर्ग व तुकड्यांचे अनुदानातून सदर रकमेची वजावट करण्यात येईल.

सोबत दिलेल्या परिपत्रकानुसार अनुदानावर आलेल्या तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षकांची मान्यता वेळेत घेण्यात यावी व देयके वेतनपथकाकडे सादर करावे.

अध्यक्ष
शिक्षण [illegible] मंडळ कडूस ता. खेड, जि.पुणे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे
मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय
कडूस,ता.खेड, जि.पुणे
13/10/15

प्रतिलिपी : मा. शिक्षण संचालक, (माध्य. व उच्च माध्यमिक),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१. यांना माहितीसाठी सादर.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर.
यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित. तसेच सुचित करण्यात येते की, वरील वर्ग अनुदान तत्वावर आणण्याची कार्यवाही करण्यात आली असल्यामुळे सदर तुकडीवर कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन उपलब्ध निधीतून अदा करण्यात यावे व निधी कमतरता असल्यास आवश्यक त्या तरतुदीची मागणी सुधारीत अंदाजपत्रकात न चुकता करण्यात यावी.

३. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, जिल्हा परिषद, अहमदनगर.
यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त अनुदान टप्प्यावर आलेल्या तुकडीवर नियुक्त कर्मचाऱ्यांची वेतन देयके उपलब्ध निधीतून अदा करावीत. जादा निधीची आवश्यकता असल्यास सुधारीत अंदाजपत्रकात मागणी न चुकता करण्यात यावी.